**आज मंगळवार दि. १५ जानेवारी, २०१९ रोजी पिफ फोरममध्ये कॉस्चुम डिझायनर डॅनिएला सिएन्सिओ यांचे 'पेहराव – एक दृष्टीकोन' या विषयावर झालेल्या व्याख्यानातील काही महत्त्वाचे मुद्दे**

- कोणत्याही चित्रपटामध्ये त्या त्या वेळी असलेला व्यक्तीरेखांचा पेहराव हा एक महत्त्वाचा भाग असतो.
- हा पेहराव भावनात्मकरित्या कथेला मदत करीत असतो
- दिग्दर्शक आपल्या नजरेतून आपल्या चित्रपटातील व्यक्तीरेखांकडे पहात असतो. त्याच्या नजरेप्रमाणे त्या व्यक्तीरेखा सत्यात साकारणे यामध्ये कॉस्चुम डिझायनरचा वाटा फार मोठा असतो.
- कॉस्चुम डिझायनरने देखील दिग्दर्शकाच्या नजरेप्रमाणे त्या त्या गोष्टी साकारण्याचा यशस्वी प्रयत्न केला पाहिजे.
- कॉस्चुम डिझायनर, हेअर डिझाईन आणि मेक अप आर्टिस्ट यांनी एकत्रितपणे त्या व्यक्तीरेखेवर काम करणे अपेक्षित असते, ज्याचा फायदा ती व्यक्तिरेखा आणखी ठळक होण्यासाठी होतो.
- पुस्तकांपेक्षा आपल्या आजूबाजूच्या वास्तविक गोष्टी कॉस्चुम डिझाईन करताना प्रेरणादायी ठरतात.
- डीओपी आणि प्रोडक्शन डिझाईन यांबरोबरही कॉस्चुम डिझायनरचा समन्वय असणे गरजेचे आहे.
- कथानकाचा विचार केला तर वास्तववादी कथानक उभारण्याबरोबरच व्यक्तीरेखा आणखी उठावदार करण्यासाठी पेहारावाचा फायदा होत असतो हे जाणूण घेत त्याचा योग्य वापर करणे गरजेचे आहे.
- कॉस्चुम डिझाईन करण्यापूर्वी त्याची रेखाटने, छायाचित्रे आणि गरज लागल्यास इतिहास हा देखील कॉस्चुम डिझायनरसाठी अभ्यासाचा महत्त्वपूर्ण भाग आहे, त्याप्रमाणे तयारी करणे गरजेचे आहे.
- अनेकदा कॉस्चुम डिझायनरसाठी वेगळे बजेट ठेवलेच जाते असे नाही, किंवा असलेले बजेट पुरेसे असतेच असे नाही त्यामुळे या गोष्टीचा सुरुवातीपासून विचार करीत त्याची गरज दिग्दर्शक आणि निर्मात्यांना पटवून द्यावी लागते.
- कोणताही कॉस्चुम डिझाईन करीत असताना त्या व्यक्तीरेखेला तो पेहाराव आरामदायी आहे का याचा विचार प्राधान्याने करावा लागतो.
- जर तो आरामदायी नसेल तर ते कथानक त्या पेहरावात आपली व्यक्तीरेखा पूर्णत: निभावू शकणार नाही, त्यामुळे ही काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे.
- याबरोबरच कॉस्चुम डिझायनर डॅनिएला सिएन्सिओ यांनी त्यांनी कॉस्चुम डिझाईन केलेल्या काही चित्रपटांमधील उदाहरणे देत पेहरावा आणि चित्रपटातील कथानक यांचा संबंध विषद केला.
- त्यांनी कॉस्चुम डिझाईन केलेल्या चित्रपटांची उदाहरणे देत त्यासाठी केलेला अभ्यास, डिझाईन्स, माहितीचे एकत्रीकरण आदी माहिती उपस्थितांसमोर मांडली.